# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ७४५/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १५/११/२०१६

**१) मोटार सायकलची चोरी. :–**

दिनांक १३/११/२०१६ चे २३.०० वा. दर. यातील फिर्यादी सनी जॉन एबरू वय १८ वर्ष रा. कपील नगर तकीया वार्ड भंडारा यांचे जे.के.दुकान समोर फिर्यादीची नबंर नसलेली बजाज पल्सर काळया निळया रंगाची कि. ५०,०००/रू ची मोटार सायकल ठेवुन मित्रा सोबत मित्र अमन यांचे घरी पाणी पिण्यास गेला असता कोणीतरी अज्ञात चोरान कोनीही नसल्याची संधी साधुन चोरून नेल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३७९, भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. दांदडे पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**२) संगनमत करून मारहान कल्याने गुन्हा नोंद. :–**

दिनांक १४/११/२०१६ रोजी २०.३० वा.दर. फिर्यादी धंनजय मनोहर सपकाळ वय ४४ वर्ष रा. पटेलपुरा वार्ड भंडारा यांचे घरासमोरील रोडवर आपली टाटा मॅजीक गाडी ठेवली. असतांना यातील आरोपीतांनी संगमत करून गाडी जवळ फटाके फोडत असतांना फिर्यादीच्या पत्नीने 'गाडीचे काचा फुटतील' असे हटकले असता आरोपी मारण्यास धावले म्हणुन फिर्यादी हा आरोपींना अडवीण्यास गेले असता आरोपी क्र. १ याने फिर्यादीचे डाव्या हाताचे मनघटाजवळ कोणत्यातरी वस्तुने मारून दुखापत केल्याने फिर्यादीचे तोंडी व डॉ.रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३२४ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी दांदडे पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**३) अवैध दारु/जुगार अडयांवर धाडी . :–**

दिनांक १४/११/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो स्टे जवारहनगर, कारधा,करडी,तुमसर,आधंळगाव,साकोली, लाखनी व भंडारा येथील अवैध दारू अडयांवर धाडी घालुन एकुण ०९ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ०७६ लिटर हातभट्टी दारु कि. १२१००/–रू. व ३ लिटर ४२० मिली लीटर देशी दारु +सडवा मोहा साहीत्य कि. ८५०/–रु. असा एकुण कि. २४,८०३/–रू. चा माल जप्त करण्यात आला आहे.

(बी. आर. गाडे)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र. ८८०५१०१११२

१५/११/१६

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.